REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० | पुणें, बुधवार, तारीख ८ नोव्हेंबर, १९४४ | अंक ४४

JUST PUBLISHED

**INDIAN RURAL PROBLEM**

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

( Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay ).

Price Rs. 8
( Postage extra ).

*Sole Selling Agents* :—

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.
9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.

**देना बँक**
देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल... ... ... | ...रु. १,००,००,००० |
| वर्गीकृत भांडवल... ... ... | ...रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल... ... ... | ...रु. ५०,००,००० |
| रिझर्व्ह फंड... ... ... ... | .. रु. ११,००,००० |
| एकूण ठेवी ... ...३१-१०-४४ | ...रु. ७,०८,९३,४४० |
| एकूण वर्किंग फंड ... ,, | ...रु. ७,९०,४३,३३६ |
| खात्यांची संख्या... ,, ... | ३०,५८१ |
| शाखांची संख्या... ... | ३० |

देना बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, हिंदुस्थान सरकारचे १० रुपये व १०० रुपये किंमतीचे प्राइझ बॉंड्सहि विकत मिळतात.

**मलेरियावर**
यशस्वी इलाज
**ॲनोफेलिन**
( ANOFELIN )
आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

**—राष्ट्रीय काटकसर—**

युद्धकार्यांची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

**—गोल्डन कोको—**

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

साठे बंधू, " गोल्डन कोको "
—सर्वत्र मिळतो—
साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

गिरगांव मुंबई नं. ४
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि., मुंबई

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी ११ हजार रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांना १०% ( कर कापून व्याजधाचा ) डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. ११ नोव्हेंबर रोजीं भरणार आहे.

### बँक ऑफ सिटिझन्सची बेळहोंगळ शाखा

दि बँक ऑफ सिटिझन्स लि. च्या बेळहोंगळ येथील शाखेचा उद्घाटन समारंभ ता. १९ ऑक्टोबर रोजीं श्री. एस. एन. अंगडी ह्यांच्या हस्तें झाला.

### पुण्याची लोकसंख्या ५३ लाखांवर गेली

पुण्याची लोकसंख्या आतां ५,६०,००० झाली आहे, तिला पुणें रेशनिंग कचेरीनें ५ जुलै, १९४४ अखेर संपलेल्या वर्षांत ११,५९,५२८ टन धान्य व २,११,८१९ मण साखर ह्यांचा पुरवठा केला.

### कोयनेलचा पुरवठा

१९४२-४३ अखेर हिंदुस्थानांतील कोयनेलचा साठा १,८९,००० पौंड इतका होता. १९४३-४४ अखेर तो २,३०,००० पौंड होता. नेहमींच्या कोयनेलच्या झाडांपासून कोयनेल मिळूं लागण्यास ७ वर्षे लागतात; रशियन पद्धतीनें ३१ वर्षांत तें मिळूं शकतें. अशीं झाडें ६०० एकरांत १९४३ सालीं लावण्यांत आलीं. १९४४ सालीं ह्याचप्रकारें १,५०० एकरांत लागवड होईल व १९४५ सालीं आणखी १,९५० एकरांत लागवड होईल.

### इंजनांची आयात

हिंदुस्थान सरकारनें २५५ ब्रॉड गेजचीं व ३७७ मीटर गेजचीं इंजनें अमेरिकेंतून मागविलीं आहेत, त्यांपैकीं ३० सप्टेंबर अखेर अनुक्रमें ४८ व १७४ इंजनें हिंदुस्थानांत येऊन दाखल झालीं आहेत.

### सरकारी अधिकाऱ्यांस महागाई भत्ता

१,००० रुपयांपर्यंतच्या पगाराच्या ज्या अधिकाऱ्यांस अद्याप महागाई भत्ता मिळत नाहीं, अशांना तो देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. विवाहित अधिकाऱ्यांना १०% व अविवाहित अधिकाऱ्यांना ५% महागाई भत्ता मिळेल. लहान मुलें असलेल्या विधुरांचा समावेश विवाहितांत केला जाईल.

### न्यू स्वदेशी मिल्सची ३० लक्ष रुपयांस खरेदी

शेठ नेमाणी ह्यांच्या मालकीची, अहमदाबाद येथील न्यू स्वदेशी मिल्स बिर्लाशेठजींनीं ३० लक्ष रुपयांस खरेदी केली आहे.

### अमेरिकन सैनिकहानि

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत अमेरिकेचे ४,८७,६९० सैनिक कामास आले आहेत.

### डेक्कन लाइफ इन्शुअरन्स कंपनीज असोसिएशन

महाराष्ट्रांतील आयुर्विमा कंपन्यांची ही असोसिएशन नुकतीच स्थापन झाली आहे. प्रोग्रेसिव्ह इं. कंपनीचे सेक्रेटरी श्री. गाडगीळ हे तिचे अध्यक्ष असून औंध म्यूच्युअलचे मॅ. डायरेक्टर श्री. जोशी हे तिचे सेक्रेटरी आहेत.

### ब्रह्मपुत्रा नदीवर प्रचंड पूल

बंगाल व आसाम ह्यांमधील दळणवळण सुधारण्याच्या दृष्टीनें सरकारनें एक प्रचंड योजना आखली आहे, तींत ब्रह्मपुत्रेवरील पूल समाविष्ट आहे. ह्या नियोजित पुलाची लांबी ८×४००'= ३,२००' व ४×१००'=४००' म्हणजे एकूण सुमारें ३,६०० फूट होईल. इतक्या लांबीचा दुसरा पूल हिंदुस्थानांत नाहीं. पुलास एकूण सुमारें २ कोटि रुपये खर्च येईल.

### हिंदी ग्रंथालयांतील ग्रंथांची संख्या

इंडियन लायब्ररी असोसिएशननें १९३८ सालीं हिंदी ग्रंथालयांची डायरेक्टरी तयार केली, त्यांत एकूण २६९ ग्रन्थालयांची माहिती येऊं शकली. त्यांची वर्गवारी पहातां, हिंदी ग्रंथालयांचें पुस्तकांच्या बाबतीमधील दारिद्र्य दिसून येतें.

| ग्रंथांची संख्या | ग्रंथालयांची संख्या |
|---|---|
| १,००,००० पेक्षा अधिक | ६ |
| ५०,००० ते १,००,००० | १० |
| २०,००० ते ५०,००० | ४२ |
| १०,००० ते २०,००० | ७४ |
| ५,००० ते १०,००० | १३७ |

### सुएझ कालव्याचे शेअर्स-जर्मनीची लुटालूट

तांबडा समुद्र व भूमध्यसमुद्र ह्यांस जोडणाऱ्या सुएझ कालव्याची मालकी एका कंपनीकडे आहे. तिच्या एकूण निर्णायक ८,००,००० भागांपैकी ३,५३,०२४ भाग ब्रिटिश सरकारचे हातीं आहेत व बाकीचे भाग इतरत्र जगभर विखुरलेले आहेत. जर्मनीनें फ्रान्स ताब्यांत घेतल्यानंतर तेथील सुएझ कालव्याचे भाग मिळवून स्वतःकडे बहुसंख्य भाग घेतले आहेत, अशी मध्यंतरीं गप्प होती. फ्रान्स जर्मनीस शरण आला, तेव्हांपासून कंपनीच्या भागीदारांची सभा झालेली नाहीं. आणखी कांहीं काळ खरी परिस्थिति कांहींच समजणार नाहीं.

### अ. भा. ग्रामोद्योग संघ

वरील संघाच्या महाराष्ट्रांतील कार्याचें नेतृत्व श्री. बा. गं. खेर ह्यांनीं पत्करलें असून श्री. गंगाधरराव देशपांडे ह्यांनीं कर्नाटकांतील कामाची धुरा स्वीकारली आहे.

### नव्या व्यापारी कॉलेजाचा नामकरण विधि

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नव्या व्यापारी कॉलेजास " दि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स " हें नांव दिल्याचें जाहीर करण्याचा समारंभ ता. ११ नोव्हेंबर रोजीं, रिझर्व्ह बँकेचे पहिले हिंदी गव्हर्नर सर चिंतामणराव देशमुख ह्यांचे हस्तें होणार आहे. बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेटनें दिलेल्या २ लक्ष रुपये देणगीच्या प्रीत्यर्थ, नव्या कॉलेजास हें नांव देण्याचें सोसायटीनें ठरविलें, हें प्रसिद्धच आहे.

### परदेशी माल लवकरच येणार

फाउंटनपेन्स, रेडिओ सेटस, घड्याळें, रेशमी माल, इत्यादींची बरीच आयात परदेशांतून लवकरच होणार आहे, असें हिंदुस्थान सरकारचे कंट्रोलर जनरल ऑफ सिव्हिल सप्लाईज, श्री. देसाई, ह्यांनीं लखनौ येथें सांगितलें.

### श्री. पी. जी. केतकर ह्यांचें निधन

मुंबई प्रां. सहकारी बँकेचे ब्रँच अकौंटंट, श्री. पी. जी. केतकर हे ता. १० ऑक्टोबर रोजीं अलाहाबाद येथें मरण पावले, हें नमूद करण्यास अत्यंत खेद वाटतो.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३६२ | ६ स्फुट विचार ... | ३६५ |
| २ हिंदुस्थानांतील धान्य परिस्थिति ... ... | ३६३ | औद्योगिक योजनेची चर्चा-साखरेचा दरमाणशीं खप. | |
| ३ मुबलक बटाट्यांचा पुरवठा ... ... ... | ३६३ | ७ एक्सचेंज बँकांचें महत्त्व | ३६६ |
| ४ नगर-सुधारणा ... | ३६४ | ८ दीर्घकालीन कर्जांचें वाढतें प्रमाण ... ... | ३६६ |
| ५ आघाडीचे पाठीमागील युद्धतयारी ... ... | ३६४ | ९ जिल्हा बँकांची घटना | ३६७ |
| | | १० बँकांचे अहवाल ... | ३६८ |



अर्थ

बुधवार, ता. ८ नोव्हेंबर, १९४४


## हिंदुस्थानांतील धान्य परिस्थिति

### सरकारी प्रयत्न व धोरण ह्यांचें निवेदन

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्रि, सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव, ह्यांनीं धान्य परिस्थितीवर मध्यवर्ती असेंब्लींत विस्तृत भाषण केलें व अन्न खात्यानें बजावलेल्या कामगिरीबद्दल स्वतःची थोडीशी पाठ पण थोपटून घेतली. हिंदुस्थानांत आतांपर्यंत ६३ लक्ष टन धान्याची आयात झाली आहे, ९५ हजार टन धान्य वाट चालत आहे व डिसेंबर, १९४४ अखेर आणखी ३ लक्ष टन धान्याचें आश्वासन मिळालेलें आहे, अशी माहिती त्यांनीं सभागृहांत सांगितली. सबंद हिंदुस्थानासाठीं मध्यवर्ती नियंत्रणाचें एकमुखी धोरण आखण्याची आवश्यकता अन्नखात्यानें एकसारखी पुरस्कारिली व अखेर सर्व प्रांत व संस्थानें ह्यांची त्यास मान्यता मिळविली, हीं मोठीच गोष्ट खात्यानें केली, असें ते म्हणाले. देशाच्या ज्या घटकांजवळ जरूरीपेक्षा अधिक अन्न आहे, त्यांनीं तें इतर घटकांना दिलें पाहिजे, ह्या तत्त्वाप्रमाणेंच आतां धान्याची वाटणी चालू आहे. धान्याच्या किंमती निश्चित करण्यांत अन्नखात्यास यश आलें आहे व मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांजवळ पुरेसे साठे निर्माण करून धान्याचे स्थानिक तुटवडे पडूं न देण्याची व्यवस्था झाली आहे, असेंहि ते म्हणाले. सरकार धान्य परिस्थिति आटोक्यांत आणूं शकतें, ह्याविषयीं लोकांत विश्वास निर्माण झाला आहे आणि ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची आहे, असें अन्नमंत्र्यांनीं सांगितलें. युद्धोत्तर काळांत हिंदी लोकांना पुरेसें, चांगलें व सात्विक अन्न मिळावें ह्या दृष्टीनें योजना आखण्यासाठीं अन्नखात्यांत एक नियोजन विभाग उघडण्याचा आपला बेत त्यांनीं जाहीर केला.

प्रांतांतील धान्य पुरवठा व रेशनिंगची प्रगति ह्यांचा अन्नमंत्र्यांनीं आढावा घेतला आहे व हिंदुस्थानांत कोठेंहि कोणासहि दररोज अच्छेरपेक्षा कमी धान्याचें रेशन मिळूं नये, अशी सरकारची खटपट असल्याचें त्यांनीं सांगितलें. आतां ४६० गांवांतील ४३ कोटि लोक रेशन पद्धतीनें अन्न खात आहेत. धान्याच्या आयातीचे संबंधांतील परिस्थिति आशादायक असल्याकारणानें, येतें वर्ष विशेष अडचणी अथवा संकटें न येतां पार पडेल असा आपला विश्वास त्यांनीं व्यक्त केला. धान्य जमा करणें, जास्त धान्य असणाऱ्या विभागांनीं तें इतरांस खुषीनें देणें, रेशनिंगखालीं अधिक लोकसंख्या येणें, भावनियंत्रण चालू रहाणें, वहातुकीची परिस्थिति सुधारणें, अन्न खात्याची कडक देखरेख राहणें, आयात चालू राहणें व बिनसरकारी पुढाऱ्यांनीं सहकार्य करणें, ह्या गोष्टींवरच अन्नपरिस्थिति सुधारणें अवलंबून राहील, असा त्यांनीं आपल्या भाषणाचा समारोप केला.

आपल्या फूड ॲडव्हायसरी कौन्सिलमध्यें भाषण करतांना, मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांनीं गेल्या दोन वर्षांपूर्वीची व आजची अन्नपरिस्थिति ह्यांची तुलना केली. दोन वर्षांपूर्वीचें अनिश्चितपणाचें व भीतिग्रस्त वातावरण, साठेबाजीची प्रवृत्ति, आयात व वहातुक ह्यांच्या अडचणी, जादा धान्य असणाऱ्या प्रांतांच्या धोरणांत निश्चितपणाचा व एकमुखीपणाचा अभाव, अपुऱ्या धान्यामुळें अडचणींत असलेल्या विभागांची धान्य मिळविण्याची धावपळ, इत्यादि गोष्टींचें चित्र रेखाटून त्या मानानें आजची परिस्थिति किती कमी असमाधानकारक आहे, हें दाखवून दिलें. खासगी व्यापाऱ्यांची जागा सरकारनें स्वतः घेऊन, आज मुंबई सरकार धान्याची प्रांतांत आयात करीत आहे व धान्य खरेदी करीत आहे, व विक्रीच्या बाबतहि सरकारनें स्वतःकडे एकमेवाद्वितीय अधिकार घेतले आहेत, त्याकारणानें दोन वर्षांपूर्वीचा भीषण काळा बाजार आतां आवळला गेला आहे. मुंबई शहरांतील नियंत्रणाच्या व रेशनिंगच्या यशस्वीपणाकडे व यासंबंधांत मुंबईस मिळालेल्या अखिल भारतीय नेतृत्वाकडे त्यांनीं अभिमानानें बोट दाखविलें. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, ह्यांनीं गव्हर्नरांच्या विधानास सर्वसाधारणपणें पुष्टि देऊन, फूड कौन्सिलच्या सूचनांचा सरकार आदरपूर्वक विचार व स्वीकार करतें, ह्याबद्दल समाधान व्यक्त केलें.

### युद्धपूर्व भावानें बटाट्यांचा मुबलक पुरवठा

चांगल्या बटाट्यांचा तुटवडा आपणांस येथें वारंवार भासतो, ह्या दृष्टीनें त्यासंबंधांतील ग्रेट ब्रिटनमधील परिस्थिति काय आहे हें समजणें उद्बोधक होईल. बटाट्यांचे बाबतींत ग्रेट ब्रिटनला परदेशांवर अवलंबून रहावें लागत नाहीं. १९३९ सालीं तेथें ४,५४,३२७ एकरांत बटाट्यांची लागवड झालेली होती; १९४४ मधील तत्सम आकडा ९,५०,००० एकरांवर गेला आहे. बटाट्यांच्या शेतकऱ्यांस द्यावयाची किंमत निश्चित करण्यांत आली आहे व बटाटे लावणारास सरकार दरसाल १० पौंड बक्षीस देतें. बटाट्यांचें दरएकरीं उत्पादन वाढविण्याचा कसून प्रयत्न चालू आहे. कांहीं चांगल्या शेतांत दर एकरीं १० टन बटाटे निघतात, तर कांहींत ३ टनहि निघत नाहींत. दरएकरीं उत्पादन निदान ७ टन तरी व्हावें, अशी खटपट चालू आहे. लोकांना पुरेसे बटाटे मिळत आहेत व इतर अन्नपदार्थांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें बटाट्यांचा खप वाढत आहे. बटाट्यांची विक्रीची किंमत युद्धापूर्वीच्या किंमतीइतकीच कायम राखण्यांत आलेली आहे व त्याकरितां सरकारनें १९४०-४१ मध्यें २ लक्ष पौंड; १९४१-४२ मध्यें १ कोटि ४४ लक्ष पौंड; १९४२-४३ मध्यें २ कोटि, ३० लक्ष पौंड व १९४३-४४ मध्यें २ कोटि, ८० लक्ष पौंड खर्च केले.

## नगर-सुधारणा

### कोल्हापूर शहराची प्रगति
( मागील अंकावरून चालू )

पैशाच्या वाटणीचें हें तत्त्व रीजन्सी कौन्सिलनें मान्य करून त्याची अंमलबजावणी करण्याचें ठरवून आपला निर्णय जाहीर केला आहे हें अभिनंदनीय आणि स्तुत्य आहे. कोल्हापुरची लोकसंख्या एक लाखाचे घरांत आली आहे आणि हें नगर व्यापार, उद्योगधंदे व व्यवहार ह्यांचें केंद्र बनलें आहे. शहरांच्या वाढीबरोबर अनेक अवघड सार्वजनिक स्वरूपाचे प्रश्न व अडचणी उद्भवतात असा सर्वसाधारण अनुभव आहे; आणि ह्या नियमास कोल्हापूर अपवाद होऊं शकत नाहीं. न झालेल्या कामांची मागची बाकी पूज्य करून त्यास प्रगतीची व सुधारणेची नवी जमा आपल्या नांवावर चढवून घ्यावयाची आहे. हें कार्य अर्थातच वेळाचें व पैशाचें आहे आणि तें योजनात्मक पद्धतीनें एकापुढें एक पाऊल टाकून पुरें केलें पाहिजे. कोल्हापूर नगरींत ह्या तऱ्हेच्या सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्यासाठी एक बृहद् योजना आंखली जात असून ती यशस्वी व्हावी ह्याकरितां सरकारनें तज्ज्ञांचें सहाय्य आणि पैशाची मदत देण्याचें ठरवलें आहे. तिच्या परिपूर्तिसाठी सरकार भांडवली स्वरूपाच्या व चालू खर्चाप्रीत्यर्थ ग्रँट्स आणि कर्ज देईल आणि नगरपालिकेच्या उत्पन्नांत भर पाडण्याचीं साधनें तिला उपलब्ध करून देईल. भांडवली खर्चाची तरतूद झाली कीं कार्यभाग झाला असें पुष्कळदां वाटतें; पण त्याच्याबरोबर चालू खर्चांत वाढ व्हावी लागते हें विसरतां कामा नये. देखरेख, डागडुजी, व्याज, सिंकिंग फंड इत्यादि बाबींची तरतूद योग्य रीतीनें न केली गेल्यास सुधारणा थोड्याच काळानें वाया जाऊं लागण्याची भीति उत्पन्न होते. तसें होऊं नये ह्याकरितां करवाढ करणें आवश्यक होतें. अपेक्षेच्या मानानें खर्च वाढतो आणि त्यासाठी उत्पन्नांत वाढ करावी लागते. सुधारणा आणि प्रगति ही फुकट मिळत नाहीं; त्यांस किंमत द्यावी लागते, ह्याचा अनुभव अशा प्रसंगीं येतो.

जनतेचा योगक्षेम चांगला चालावा म्हणून तिनें दिलेल्या पैशाचा विनियोग तिच्याच हितार्थ तिनें करावयाचा आहे हें राज्यव्यवस्थेचें सूत्र ध्यानांत आलें असतां मध्यवर्ती व स्थानिक कारभाराच्या क्षेत्रांत अधिकार व उत्पन्न ह्यांची वाटणी कोणच्या तत्त्वावर व्हावी हें उघड होतें आणि राज्यघटनेच्या या दोन घटकांमध्यें वाटणीविषयीं घासाघीस उत्पन्न झाली असतां तिचा समाधानकारक निकाल कसा करावा ह्या प्रश्नास उत्तर मिळतें. कोल्हापुरांत प्रगतीच्या मार्गानें पुढें पाऊल टाकलें जात आहे असें दिसतें. ही प्रगति त्रिविध आहे. संघटनात्मक, द्रव्यविषयक व व्यवहारासंबंधीं. त्यांतली पहिली गोष्ट स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारासाठी कायदे व नियम ह्यांची चौकट तयार करण्यासंबंधांतली आहे. पद्धतशीर नगररचना, स्थानिक स्वराज्य संस्थांचीं कर्जे व त्यांचे हिशेब, इत्यादि विषयांच्या नियमनाकरितां आवश्यक असलेल्या कायद्यांची व नियमांची तजवीज झाली आहे.

आपला इतिहास आपण स्वतः ध्येयप्रेरित हातांनीं बनवीत आहों ह्याची जाणीव नागरिकांनीं जागृत ठेवली पाहिजे. प्रवाहपतित राहून निसर्ग नेईल तिकडे जाणें हें कमकुवतपणाचें लक्षण आहे. सद्बुद्धीनें सामाजिक इतिहासास वळण लावणें ह्यांत खरें पौरुष आहे. कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थित्यंतरांचें सुंदर चित्र श्री. जयंतराव नाईक ह्यांनीं "कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास" ह्या आपल्या चित्तवेधक व बोधप्रद ग्रंथांत काढलें आहे. ह्या कामांत इतिहाससंशोधक, ध्येयवादी समाजसेवक आणि उत्साही कार्यकर्ता असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे निरनिराळे पैलू खुलून दिसत आहेत. मागील इतिहासांतून नवा इतिहास निर्माण होत असतो आणि त्याच्या गतीवर बुद्धिपुरःसर केलेले प्रयत्न किंवा त्यांचा अभाव ह्यांचा परिणाम कसा घडून येतो हें श्री. नाईक ह्यांनीं संगतवार दिलेल्या तीन खंडांच्या माहितीवरून स्पष्ट होतें. ज्यास त्यांनीं " क्रांतिकाळ " असें संबोधिलें आहे त्याच्या प्रारंभाच्या अवस्थेंत आज नगरपालिका आहे. ह्या स्थितींत लोकशिक्षण व प्रचार ह्यांचें कार्य ह्या प्रगतीस आवश्यक असून त्याचाहि प्रारंभ आज होत आहे. श्री. नाईक ह्यांच्या उद्योगाचा आणि स्फूर्तिदायक व कार्यप्रवण ग्रंथाचा उपयोग ह्या कामींहि होवो अशी इच्छा प्रदर्शित करून त्याचें प्रकाशन मी करतों. (समाप्त)

---

### आघाडीचे पाठीमागील वैद्यकीय तयारी

नॉर्मंडीमध्यें दोस्त सैन्य उतरलें, तेव्हां ८ लक्ष लोकांना रक्तांतरासाठी पुरेल एवढें सांठवलेलें रक्त, पेनिसिलीनचे ६ लक्ष डोस व १० हजार पौंड सल्फा औषधें तयार ठेवण्यांत आलीं होतीं. जखमी सैनिकांच्या यातना थांबविण्यासाठी ६३/४ लक्ष मॉर्फिआच्या सुया तयार होत्या. नॉर्मंडींत सैनिक पुढें सरकले, तशी तेथील जखमी सैनिक इंग्लंडमध्यें आणणारीं व तेथून माल घेऊन जाणारीं विमानें ह्यांची ये-जा सुरू झाली. प्रत्येक वहतुकीच्या विमानांत १८ जखमी सैनिकांची सोय होती व त्यांचेबरोबर एक नर्स असे. ६०० ते ८०० जखमी सैनिकांची सोय असलेलीं प्रचंड अमेरिकन विमानें इंग्लंडांत तयारच होतीं, त्यांतून अमेरिकन जखमी सैनिक तात्काळ अमेरिकेस नेण्यांत येऊं लागले. इस्पितळांत पोचूं शकलेल्या प्रत्येक १०० सैनिकांपैकी ९७ सैनिकांचे प्राण वांचले. गेल्या महायुद्धांत ८९% जखमी सैनिकच जिवंत राहूं शकले. अगदीं रणक्षेत्राजवळ, लढाईपासून ५ मैलांचे टापूंत अवघड शस्त्रक्रिया करण्यांत आल्या, रक्तांतराची उत्कृष्ट व्यवस्था झाली, जखमी सैनिकांचें तात्काळ स्थलांतर होऊं शकलें व सल्फा औषधें यशस्वी झालीं, ह्याकारणानें शस्त्रक्रियेनंतर मरण पावणाऱ्या सैनिकांचें प्रमाण मागील युद्धाचे मानानें निम्म्यावर आलें. चालू महायुद्धांतील हत्येचीं शस्त्रास्त्रें फारच संहारक असल्याकारणानें, हात-पाय तोडावे लागल्याचीं उदाहरणें जास्त घडलीं, परंतु युद्धापूर्वीची त्यासंबंधांतील भीति वस्तुस्थितीपेक्षा फारच ज्यास्त होती, असें आढळून आलें. कोणत्याहि अमेरिकन जखमी सैनिकाचे दोन्ही हात-पाय तोडण्याची जून अखेर पाळी आलेली नव्हती. पॅसिफिक महासागरांतील बेटांमधील जंगलें, आफ्रिकेंतील वाळवंट व अल्युशियन्समधील बर्फ ह्या सर्वांना तोंड द्यावें लागलेल्या सैनिकांस रोगांमुळें मृत्यु येण्याचें प्रमाण फारच थोडें आढळलें. गेल्या महायुद्धांत तें दर हजारी १५·६ होतें, तें आतां फक्त ०·६ झालें आहे; म्हणजे त्यांत ९५% पेक्षा जास्त उतार झाला आहे. त्याचें कारण रोगप्रतिबंधक इलाज व सैनिकांचा वक्तशीर, प्रमाणबद्ध आहार हें आहे.

---

# स्फुट विचार

## औद्योगिक योजनेची मध्यवर्ती असेंब्लींत चर्चा

मध्यवर्ती असेंब्लीमध्यें हिंदी औद्योगिक पुढाऱ्यांनीं तयार केलेल्या युद्धोत्तर औद्योगिक अभिवृद्धीच्या पंचदशवार्षिक योजनेस हिंदुस्थान सरकारनें पाठिंबा देऊं नये ह्या आशयाचा एक ठराव सर झियाउद्दीन अहंमद ह्यांनीं गेल्या आठवड्यांत पुढें मांडला. त्यांचे दृष्टीनें ही योजना दोन महत्त्वाच्या बाबतींत सदोष आहे. सामान्य जनतेची क्रयशक्ति वाढविण्याची आणि बेकारीच्या निवारणाची तरतूद तीमध्यें नाहीं अशी तक्रार करून योजना सफल होण्यास राष्ट्रीय जबाबदारीच्या मध्यवर्ती सरकारच्या हातांत राजसत्ता असणें अगत्याचें आहे ही औद्योगिक संवर्धनाचे योजनेच्या मुळाशीं असलेली अट पुरी होण्याची काय व्यवस्था सर आर्देशीर दलाल ह्यांनीं केली आहे असा प्रश्न त्यांनीं विचारला. आज हिंदुस्थानांत पैशाची किंमत विलक्षण उतरली आहे ती वाढून म्हणजे बाजारभाव कमी होऊन लोकांच्या प्राप्तींतून त्यांस चरितार्थाचीं साधनें सोयीनें उपलब्ध होणें आवश्यक आहे, परंतु औद्योगिक व आर्थिक उन्नतीची योजना आखणारांनीं आपल्या स्वतःच्या फायद्याचें सध्याचें प्रमाण अबाधित राखण्याची मात्र व्यवस्था चालवली आहे अशी त्यांनीं टीका केली. बहुसंख्य हिंदी जनतेच्या म्हणजे शेतकरी वर्गाच्या उन्नतीची आणि खेडेगांवी व लहान उद्योगधंद्यांची काळजी योजना तयार करणारांस वाटली नाहीं असें, सर झिआउद्दिन ह्यांचें म्हणणें आहे. दुसऱ्या कांहीं वक्त्यांनीं त्यांच्या मुद्यांस सर्वसाधारण रीतीचा पाठिंबा दिला आणि निरनिराळ्या औद्योगिक योजनांची छाननी करून असेंब्लीस स्वतःचा त्यांवरील अभिप्राय सादर करण्यासाठी एक समिति नेमली जावी अशी एक उपसूचना मूळ ठरावावर मांडण्यांत आली. सर विठ्ठल चंदावरकर ह्यांनीं पंचदशवार्षिक योजनेस पाठिंबा दिला आणि राष्ट्रीय मध्यवर्ती मंत्रिमंडळ अधिकारारूढ होणें अगत्याचें असलें तरी ती इष्ट घटना अस्तित्वांत येईपर्यंत स्वस्थ न बसतां भावी औद्योगिक प्रगतीची तयारी करण्यांत हिंदुस्थान सरकारनें प्रकट केलेला उत्साह अभिनंदनीय आहे असें ते म्हणाले. हिंदी कारखानदारांस शेतीच्या सुधारणेचें महत्त्व अवगत असून राष्ट्रीय भूमिकेवरच आर्थिक प्रगति होणें अगत्याचें आहे असें त्यांचें मत असल्यानें सर्वांनीं, सर आर्देशीर ह्यांच्या प्रयत्नांस हार्दिक पाठिंबा द्यावा ह्यांतच सर्व देशाचें खरें हित आहे, अशा आशयाचें भाषण करून सर विठ्ठल ह्यांनीं सर झियाउद्दिन ह्यांच्या टीकेस उत्तर दिलें. पंचदशवार्षिक योजनेनें मूठभर भांडवलवाल्यांचा तेवढा फायदा होईल आणि तिचा सामान्य जनतेस मुळींच उपयोग होणार नाहीं अशी तक्रार कांहीं सभासदांनीं केली तर स्थूलमानानें विचार करतां ती योजना योग्य आहे असा अभिप्राय इतरांनीं व्यक्त केला. प्रांतिक सरकारांनीं स्वतःच्या योजना तयार केल्या तरी अखिल भारतीय स्वरूपाच्या बृहद् योजनेशीं त्या सुसंगत असल्या पाहिजेत, राष्ट्रीय महत्त्वाचे धंदे सरकारी नियंत्रणाखालीं आणणें आवश्यक होईल, शेतीच्या धंद्याचें संरक्षण करणें व जनतेची राहणी सुधारणें ह्या बाबींकडे लक्ष पुरवावें लागेल, हे मुद्दे असेंब्लींत झालेल्या चर्चेमध्यें महत्त्वाचे होते.

## साखरेचा दरमाणशी खप

दरमाणशी खपाच्या जागतिक आकड्यांवरून केवळ हिंदुस्थानांत साखरेच्या उत्पादनास किती वाव आहे ह्यासंबंधीं निश्चित अनुमान काढणें चुकीचें ठरेल; कारण साखरेचा खप हा रहाणीच्या मानावर पुष्कळ अवलंबून असतो. १९३२ साली हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण मिळालें, तेव्हांपासून ह्या धंद्याची एकसारखी वाढ होत गेली आहे. त्या साली हिंदुस्थानांत १,५८,००० टन साखर तयार करणारे फक्त ३२ कारखाने होते; १९४३–४४ मध्यें त्यांची संख्या १५८ झाली व त्यांत १२½ लक्ष टन साखर निघूं शकली. हिंदुस्थान देशांत साखरेचा एकूण उठाव पुष्कळ असला, तरी दरमाणशी खप मात्र अगदी कमी आहे व त्यांत वाढ होण्यास पुष्कळच वाव आहे. शेती व उद्योगधंदे ह्यांच्या वाढीबरोबर जनतेची रहाणी सुधारल्यास त्याचा परिणाम साखरेच्या खपावर तात्काळ होईल. दरमाणशी साखरेच्या खपाचे तुलनात्मक देशवार आकडे खालीं दिले आहेत.—

| देश | दरमाणशी खप (शेर) |
|---|---|
| अमेरिका | ५१½ |
| ग्रेट ब्रिटन | ५६ |
| न्यू झीलंड | ५७½ |
| ऑस्ट्रेलिया | ५७ |
| फ्रान्स | २७ |
| जर्मनी | २९½ |
| क्युबा | ४४ |
| डेन्मार्क | ६४ |
| हिंदुस्थान | २½ |

## हिंदी राष्ट्रीय कर्जांतील दीर्घकालीन कर्जाचें वाढतें प्रमाण

१९३८–३९ मध्यें ग्रेट ब्रिटनच्या एकूण राष्ट्रीय कर्जाच्या ७१·५% इतकें कर्ज १० वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीचें होतें; १९४२–४३ अखेर अशा कर्जाचें प्रमाण ४२·६% वर आलें. ह्याचा अर्थ, युद्धकाळांत ग्रेट ब्रिटननें कर्ज उभारलें तें मुख्यतः अल्प मुदतीचेंच होतें. हिंदुस्थानाची ह्या संबंधांतील परिस्थिति ह्याच्या उलट व अधिक समाधानकारक आहे. १९३९ साली हिंदुस्थान सरकारच्या एकूण कर्जापैकीं १६% कर्ज १० वर्षांपेक्षा अधिक मुदतीचें होतें; १९४४ मध्यें अशा कर्जाचें प्रमाण ३३·४% झालें आहे. एकूण कर्जांतील ट्रेझरी बिलांचा हिस्सा बराच कमी होत आला आहे. खालील तक्ता ह्या दृष्टीनें मार्गदर्शक होईल:—

| | मार्च, १९४२ अखेर | | मार्च, १९४४ अखेर | |
|---|---|---|---|---|
| कर्जाचा प्रकार | रकम (कोटि रु.) | एकूण कर्जाशीं प्रमाण (%) | रकम (कोटि रु.) | एकूण कर्जाशीं प्रमाण (%) |
| बिन मुदतीचीं | १६४·१८ | १७·४ | २८३·८९ | २१·३ |
| १० वर्षांवरील | २६१·७७ | २७·८ | ४४५·६७ | ३३·४ |
| ५ ते १० वर्षांचीं | ६८·७५ | ७·३ | ८५·३८ | ६·४ |
| ५ वर्षांखालील | ११७·१६ | १२·५ | १८९·८६ | १३·७ |
| ट्रेझरी बिलें | १३६·९८ | १४·६ | ११०·६१ | ५·३ |

### हिंदी बँकिंग क्षेत्रांत एक्सचेंज बँकांचें महत्त्व

हिंदी बँकिंग क्षेत्रांत अद्याप विदेशी एक्सचेंज बँकांचें केवढें मोठें महत्त्व आहे, ह्याची कल्पना खालील तक्ता स्पष्टपणें देईल. रिझर्व्ह बँकेनें प्रसिद्ध केलेल्या आकड्यांत, इंपीरिअल बँक (२९८ कचेऱ्या), एक्सचेंज बँका (८४ कचेऱ्या), इतर शेड्यूल्ड बँका (१४०० कचेऱ्या), इतर बँका (१,५३१ कचेऱ्या), ह्या सर्वांच्या व्यवहाराचे आकडे पाहिले, तर ८४ कचेऱ्या असलेल्या १९ विदेशी एक्सचेंज बँका भांडवल, ठेवी, गुंतवणूक, बिलडिस्काउंट, इत्यादि सर्व बाबतींत बाकी उरलेल्या सगळ्या हिंदी बँकांचा व्यवहार एकत्र केला, तरी त्यांस सहज मागें टाकूं शकतात! मुंबई येथें बँकर्स क्लिअरिंग हाऊस आहे, त्यांच्या ३३ सभासदांची यादी पाहिली, तर त्यांपैकीं १३ सभासद-बँका एक्सचेंज बँकाच आहेत. स्वाभाविकच, त्यांचें क्लिअरिंग हाउसच्या व्यवहारांत प्राधान्य आहे. गेल्या दोन तीन वर्षांतच कांहीं मोठ्या हिंदी बँका निघाल्या, त्यामुळें हिंदी सभासद बँकांची संख्या एवढी तरी होऊं शकली. ३१ डिसेंबर १९४० रोजीं मुंबई क्लिअरिंग हाउसच्या सभासद बँकांची संख्या ३० होती, त्यांपैकीं हिंदी बँका फक्त १२ च होत्या!

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| बँकांचा प्रकार | वर्ष | वसूल भांडवल व रिझर्व्ह | ठेवी | गुंतवणूक | बिल डिस्काउंट, कर्जें इ. |
|---|---|---|---|---|---|
| १ इंपीरिअल बँक | १९४२ | ११,३८ | १६४,४६ | ११६,४१ | ३३,७९ |
| १ ,, | १९४३ | ११,४८ | २१४,५३ | १३०,२० | ४०,६० |
| १९ एक्सचेंज बँका | १९४२ | १४२,२५ | २६०६,३८ | १४४१,३६ | ५१३,२५ |
| १९ ,, | १९४३ | १४२,४१ | २६८५,९६ | १५२६,६८ | ५०८,८० |
| ४७ इतर शेड्यूल्ड बँका | १९४२ | १६,२५ | १८९,३४ | १०१,७७ | ६०,६८ |
| ५७ ,, | १९४३ | २३,६७ | ३१९,६५ | १६४,२५ | १०७,३३ |
| ४४५ बिगर शेड्यूल्ड बँका | १९४२ | ६,७१ | ३४,८० | ९,११ | २१,८० |
| ४६१ ,, | १९४३ | ७,१८ | ४७,२४ | ११,१५ | २७,२६ |

### ट्रामवेज विकत घेण्याचें ठरलें, परंतु पुढची व्यवस्था?

कलकत्ता कॉर्पोरेशननें तेथील ट्रामवे कंपनीस २७ जून रोजीं नोटीस देऊन, १ जानेवारी १९४५ पासून ट्रामवे कंपनीची व्यवस्था स्वतःकडे घेण्याचें जाहीर केलें आहे. कंपनीचें हौरा म्युनिसिपॅलिटी, हौरा ब्रिज कमिशनर्स व भारतमंत्रि ह्यांचेशीं स्वतंत्र करार आहेत, ह्यासंबंधांत कलकत्ता कॉर्पोरेशननें काय केलें आहे, कॉर्पोरेशननें ट्रामवेज चालविण्यास लागणाऱ्या मुबलक पैशाची पुरेशी व्यवस्था केली आहे काय; ट्रामवे कंपनीनें आपल्यां नोकरांस बडतर्फीच्या नोटीसा दिल्यानंतर कॉर्पोरेशननें ठराविक दिवशीं ट्रामवेज आपल्या ताब्यांत घेतल्या नाहींत तर कसा घोटाळा होईल; त्यामुळें कंपनीचें होणारें नुकसान कॉर्पोरेशनला भरून द्यावें लागून शिवाय जनतेची किती गैरसोय होईल, इत्यादि प्रश्नांचा विचार कंपनी व कॉर्पोरेशन ह्यांच्या प्रतिनिधींनीं एकत्र बसून करावा अशी कंपनीनें सूचना केली आहे.

### जपानी वृत्तपत्रें फक्त दोन पृष्ठांचीं

जपानमध्यें १ नोव्हेंबरनंतर प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचा आकार दोन पृष्ठांपेक्षा अधिक असतां कामा नये, असा तेथें नियम करण्यांत आला आहे.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४३ अखेर
नव्या कामांत ११० टक्के वाढ
चालू कामांत १०७ टक्के वाढ
आयुर्विमानिधींत ८० टक्के वाढ
— आपला विमा किंवा एजन्सी आजच द्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे — सुपरिटेंडेंट
व्ही. जी. जोशी — मॅनेजिंग डायरेक्टर

दि बँक ऑफ इंडिया लि.
[ स्थापना : १९०६ ]
अधिकृत भांडवल ... ... ... रु. २,००,००,०००
वसूल झालेलें भांडवल ... ... ... रु. १,००,००,०००
रिझर्व्ह फंड ... ... ... रु. १,२३,००,०००
मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा: अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).
लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष) श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.
करंट डिपॉझिट अकाउंट्स :
दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.
एजंट:—एच्. ए. करीमभाई

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## जिल्हा बँकांची घटना

### डायरेक्टर निवडून येण्यासाठी किमान लायकीची आवश्यकता

( लेखकः—श्री. वा. चिं. भानु. )

दरसालचा सप्टेंबर महिना म्हणजे आपल्या पुणें शहरांतील सहकारी संस्थांच्या वार्षिक निवडणुकीचा मोसम. या मोसमांत कुठेंही चार पांच सहकारी जमलेले पहा, त्यांच्या बोलण्यांत एकच विषय. अमुक कॉसमासला उभा आहे, अमुक रुपीला डोकावतो आहे; अमुकानें मर्चंट बँकेंत शिरकाव केला तर अमुक सेंट्रलसाठीं घरटीप करून मतदारांचे उंबरठे झिजवूं लागला आहे. हिरव्या यादींत कोणकोण घ्यावेत, पिवळ्यांत कोण आले, अमक्या बँकेच्या वतनदारांत यंदा कोण वशिला मारतोय, मारे गर्दी! याच बरोबर कांहीं सहकारी अड्ड्यांवर खलबतखाने सुरू होऊन कोणाला उचलून धरायचा व कोणाला सपशेल पाडायचा, कोणाला नुसती तोंडी सहानुभूती दाखवावयाची तर कोणाला कसा कट्टर विरोध करायचा; कोणाला गनिमी काव्यानें फसवायचा तर कोणाला कसा चकवायचा यासंबंधानें वाटाघाटी—गुप्त वाटाघाटी—चालूं होतात. चर्चिल अन् रूझवेल्ट, किंवा स्टॅलिन अन् जपानचा प्रतिनिधी यांचीं सुद्धां खलबतें व मुलाखती इतक्या हिरीरीनें होत नसतील! पण आमच्या पुण्यांतल्या कांहीं जणांना या सप्टेंबर महिन्यांत निवडणुकीचें वारें शिरून जणूं काय सारें जग या आमच्या पुण्यांतल्या निवडणुकींवरच अवलंबून राहणार आहे असें वाटतें ! दिवसानुदिवस सहकारी बँकांच्या निवडणुकी ज्यास्त ज्यास्त लढविल्या जाणार, अशीं चिन्हें दिसत आहेत. निवडून येण्यासाठी अप्रस्तुत मार्गाचा अवलंब एकानें केला कीं दुसऱ्यासहि करावा लागतो ह्यामुळें निवडणुकींत चांगल्या उमेदवारांची कुचंबणा होणार असें दिसतें.

अशा मार्गानें निवडून येणाऱ्या उमेदवाराचे हातीं हजारों रुपयांची उलाढाल करणाऱ्या सहकारी संस्थांचा कारभार जाणार आहे असा नुसता विचार जरी मनांत आला तरी अंगावर शहारे येऊन कांटा उभा राहतो व वाटूं लागतें कीं, कौन्सिलें, बोर्डें आणि म्युनिसिपालिट्या व सहकारी संस्थांचीं कारभारी मंडळें यांच्यांत आतां काय भेद उरला आहे ? कौन्सिलें वगैरेंचा मतदार संघ सरकारच्या कृपेनें पुष्कळसा अशिक्षित तरी आहे. पण आमच्या सहकारी संस्थांचा मतदार संघ चांगला सुशिक्षित, समंजस, जाणता व संस्थेच्या कारभाराची जोखीम व जबाबदारी जाणणारा असतांना निवडणुकीच्या वेळीं मात्र भांग प्याल्यासारखा अगर अंधळा व बहिरा कसा होतो व उमेदवाराची लायकी लक्षांत न घेतां वगवशिला, भाडभीड, किंवा प्रसंगीं मतांच्या रोखीचे विकीला कसा बळी पडतो याचें मोठें आश्चर्य वाटतें. यावरून मला एकच अत्यंत अप्रिय व कटु पण सत्य असें विधान करावेसें वाटतें कीं अद्याप आपल्या समंजस म्हणविणारांनाही मताधिकाराच्या जबाबदारीची; किंवा सार्वजनिक कार्यांतील जबाबदारीची यथायोग्य जाणीव झालेली नाहीं !

सहकारी संस्थेंत, विशेषतः जिल्हा मध्यवर्ती बँकेंत, पैशांचा व्यवहार असतो. जनतेचा विश्वास संपादन करून बँकेचे चालक ठेवीदारांचा पैसा लक्षावधि रुपयांनीं गोळा करीत असतात व त्या पैशाचा व्यवहार कसा करावा हें ठरविणारे बोर्डाचे सभासद मात्र कसे निवडून येतात याचें अगदीं वरवरचें दिग्दर्शन प्रारंभीं केलें आहेच. सहकारी कायद्यांच्या अनेक कलमांचा काटेरी लगाम जिल्हा बँकांना आहे म्हणूनच केवळ जिल्हा बँकांतला ठेवीदारांचा पैसा सुरक्षित आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

कायद्याच्या कलमांच्या बंधनाबरोबरच सहकारी बँकांच्या विशेषतः जिल्हा बँकांच्या बोर्डावर निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारांना कांहीं विशिष्ट बंधनें असावींत असें आतां खास वाटूं लागलें आहे. हल्लीं बँकेचा रु. १० पासून ५० रु. पर्यंतचा एक भाग घेणारासही उमेदवार म्हणून उभें राहतां येतें आणि प्रारंभींच अमळ भडकपणानें दर्शविलेल्या मार्गानें निवडणुकी लढवून निवडूनही येतां येतें. जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत एक भाग खरेदी केला कीं ७०–८० लाखांपर्यंतच्या खेळत्या भांडवलाचा कारभार करणाऱ्या बोर्डावर निवडून येण्यास कोणीही पात्र होऊं शकतो, इतकेंच नव्हे तर रिझर्व बँकेचे पहिले हिंदी गव्हर्नर सर चिंतामण देशमुख, प्रिन्सिपाल धनंजयराव गाडगीळ, प्रो. वामनराव काळे इत्यादि नामवंत अर्थशास्त्रज्ञानाही उपदेश करण्याचा आव आणूं शकतो ! अर्थात हा एक केवळ काल्पनिक दाखला म्हटला, तरी वास्तविक पहातां अशांना केवळ खटपटी लटपटीनें अधिक मतें मिळवितां आलीं, येवढ्याचसाठी लक्षावधी रुपयांच्या उलाढालीचे संस्थेंत कारभारी होतां यावें हा सहकाराचा विपर्यास आहे असें मी कां म्हणूं नये ?

म्हणून सहकारी विचारवंतांना माझी अशी नम्र विनंती आहे कीं निदान पहिल्या प्रथम जिल्हा बँकेच्या बोर्डावर निवडून येणारांना कांहीं तरी विशिष्ट लायकीचीं बंधनें असावींत असें स्पष्टपणें म्हणण्याची वेळ आली आहे. सहकाराची चळवळ सुरू होऊन आतां ४० वर्षे होऊन गेलीं. प्रारंभींचें प्रचारकार्य आतां पुष्कळ झालें आहे. सांप्रत जिल्हा बँकांजवळ त्यांना झेंपणार नाहीं इतका पैसा ठेवीच्या रूपानें आपल्या पायांनीं चालत येतो आहे. अशावेळीं डायरेक्टरांचे बोर्ड अधिक चाणाक्ष, अधिक कर्तव्य तत्पर, अधिक दूर दृष्टीचें, अधिक व्यापकतेनें विचार करण्यास समर्थ व अधिक तज्ञ असें होईल तरच या ठेवींचा उपयोग सर्व सामान्य जनतेला व राष्ट्राला उपकारक असा होईल.

जिल्हा बँकेचे बोर्डावर जे डायरेक्टर असतात त्यांचे मुख्य दोन विभाग पडतात. एक बँकेला जोडलेल्या सोसायट्यांचे प्रतिनिधींनीं निवडून दिलेले व दुसरा बँकेच्या वैयक्तिक सभासदांनीं निवडून दिलेले. सोसायट्यांच्या एकंदर कारभाराची जी सहकारी खात्याकडून दरसाल हिशेब तपासणी होते त्या तपासणींत उत्तम, मध्यम, कनिष्ठ व हीन असे चार दर्जे दर्शविण्यास अ, ब, क व ड अशी वर्गवारी ठरविण्यांत येते. तेव्हां फक्त अ आणि ब वर्गांतीलच सोसायट्यांच्या प्रतिनिधींना बँकेच्या बोर्डावर निवडून येण्यास पात्रता असावी. शिवाय जो उमेदवार उभा राहणार असेल त्यानें आपापल्या हद्दींच्या सुपरवायझिंग युनियनचे बोर्डावर निदान ३ वर्षे तरी काम केलें असलें पाहिजे व तो स्वतः थकबाकीदार असतां कामा नये. वैयक्तिक सभासदांपैकीं त्यांना उमेदवार म्हणून उभें राहावयाचें असेल त्यानें बँकेचे कमींत कमी १,००० रुपये किंमतीचे शेअर्स घेतलेले असावेत. त्याचें शिक्षण निदान मॅट्रिक पासपर्यंत तरी असलेंच पाहिजे. शिवाय त्यानें

बँकेच्या कार्यक्षेत्रांतील कोणत्याही एका नागरी प्राथमिक सोसायटीचे पंचकमिटींत २ वर्षे काम केलेलें असलें पाहिजे, व तो स्वतः थकबाकीदार असतां कामा नये. सोसायट्या व वैयक्तिक सभासद यांच्यातर्फे निवडून येणारांची संख्या समान असावी. कलेक्टर किंवा सहकारी खातें यांना बोर्डावर प्रतिनिधि नेमण्याचा अधिकार आतां बिलकूल असूं नये. त्याऐवजीं सहकारी खात्यानें कांहीं नामांकित व व्यवहारकुशल अशा सभासदांचीं नांवें साधारण सभेला सुचवावींत व त्यामधून सभेनें दोघांची निवड करून घ्यावी. असें झाल्यास नेमणुकीमुळें जो वगवशिलेबाजीनें होयबांचा शिरकाव बँकेच्या बोर्डावर होतो तो बंद होऊन नामवंत व तज्ज्ञ अशांपैकीं दोन सभासद साधारण सभेच्या बहुमतानें व मानानें बँकेच्या बोर्डावर येऊं शकतील कीं ज्यांना सर्रास निवडणुकीचा हेंदोसधुळा घालण्याची फुरसुद नाहीं किंवा इच्छा नाहीं पण आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा मात्र संस्थेस देण्यास जे आनंदानें तयार आहेत.

अशा धर्तीनें निवडून आलेल्या बोर्डाची मुदत ३ वर्षांची असावी व दरसाल त्यांपैकीं फक्त १/३ सभासदांचीच निवडणूक व्हावी. म्हणजे एकदां निवडून आलेला डायरेक्टर निदान ३ वर्षे तरी बोर्डावर राहील. बोर्डाचे चेअरमनची निवडणूक अशीच ३ वर्षांची असावी. असें झाल्यास काम करण्याची लायकी व इच्छा आणि फुरसद असणाऱ्या होतकरू मंडळींना दरसाल निवडणुकीचे दिव्यांतून पार पडण्याचें कारण पडणार नाहीं !

मीं वर सुचविलेली घटना सर्वस्वी बिनतोड आणि ठाकठीक आहे असें मला म्हणावयाचें नाहीं. त्यांतील मुख्य हेतूला बिघाड न आणणारे फरक करण्यास वाव नाहीं असेंहि नाहीं. पण केवळ विचारांना चालना देण्यासच हा अमळ नाजुक प्रश्न थोड्या फार कठोरपणानें विचारवंतापुढें मांडला आहे.

---

### दि मिरज स्टेट बँक लि.

१९४१–४२ मध्यें वरील बँकेकडे २२ लाखांच्या ठेवी होत्या. जून १९४४ अखेर त्या ४६ लक्ष, ६५ हजार रुपयांवर गेल्या आहेत. भाग भांडवल २० हजार रु. कायम आहे व त्यावर गेल्या वर्षी ४४,६७७ रुपये निवळ नफा सुटला. भागीदारांना १४% डिव्हिडंड व ४% बोनस देण्यांत आलें व बाकीच्या रकमेचा विनियोग बँकेच्या शिरस्त्याप्रमाणें रिझर्व्ह व इतर फंड मजबूत करण्याकडे करण्यांत आला.

### वेंगुर्ला को. अर्बन बँक लि., वेंगुर्ला

वरील बँकेच्या एकाहि सभासदाकडे कर्ज अगर व्याज थकबाकी म्हणून राहिलेलें नाहीं. बँकेला 'अ' वर्ग मिळालेला आहे. बँकेच्या एकूण ३ १/३ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी ७९ १/२ हजार रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. रोख्यांतील गुंतवणूक गेल्या वर्षापेक्षा दुपटीहून अधिक ( २ लक्ष, २० १/२ हजार रु. ) झाली आहे.

### बेळगांव पायोनियर अर्बन को. बँक लि.

" अहवाल सालीं बँकेच्या शेअर भांडवलांत व ठेवींच्या रकमांत बरीच वाढ झाली आहे. कर्जाच्या रकमेंत विशेष घट झाल्यानें बँकेचा नफा १,४९० रुपयांनीं घटला आहे. " एकूण २३ लक्ष, रुपये खेळत्या भांडवलापैकीं ५ १/२ लक्ष रुपये भांडवल बँकेचें स्वतःचें आहे. कर्जे व इन्व्हेस्टमेंटस ह्यांचे मानानें जवळील व बँकांतील शिलकांचा आकडा ( १३ लक्ष रु. ) जास्त दिसतो.


* *
पूना गेस्ट हाऊस



टेलिफोन नं. ७७९
संस्थापक :
* * कै. नानासाहेब सरपोतदार

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणे झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

## पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

**श्रीमंत कसें व्हावें?** संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. **काम आणि कामिनी.** काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ। किं. १॥ रु. **मृत्युलोकचा प्रवास !** मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालीचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विरट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील
## आदर्श निवासस्थान व भोजनालय
## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
## ढेकणांच्या उदबत्त्या
(ABC)
## BUG COILS ( ABC )

प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १८८, ट. ख. निराळा.

दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २


हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.